ePaper **मल्लिकार्जुन खरगेंकडून मनुस्मृतीचा उल्लेख, राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर आरोप**



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™



पान 3 वरुन...

शहर अभियंता पदोन्नतीवरून भाजपमध्ये विसंवाद?

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 31 जुलै 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज

# २२ राज्यांना पावसाचा अलर्ट!

**महाईन्यूज । कोलकाता**

**महाराष्ट्रासह देशातील अनेक राज्यांमध्ये पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने ३१ जुलै रोजी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांसाठी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. विशेषतः विदर्भात पुढील २४ तास अत्यंत महत्त्वाचे ठरणार असून, अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी अतिवृष्टी होण्याची शक्यता असून, सुमारे २०० मिमीपर्यंत पावसाची नोंद होऊ शकते, असा अंदाज आहे.**





विदर्भावर सक्रिय झालेल्या हवामान प्रणालीमुळे पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. छत्तीसगड आणि मध्य प्रदेश परिसरात निर्माण झालेल्या हवामानाच्या स्थितीचा परिणाम विदर्भातील अनेक भागांवर होत आहे. त्यामुळे पश्चिम विदर्भासह पूर्व विदर्भातील काही जिल्ह्यांमध्येही जोरदार पाऊस होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

### या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट

विदर्भातील वाशिम, वर्धा, अकोला, चंद्रपूर आणि नागपूर या जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. या जिल्ह्यांमध्येही मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. काही ठिकाणी १५० मिमी किंवा त्याहून अधिक पावसाची नोंद होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. गडचिरोली आणि चंद्रपूरमध्ये रात्रीच्या वेळेत तसेच शनिवारी सकाळच्या सुमारास पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांनी नदी, नाले आणि ओढ्यांच्या परिसरात जाणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### अमरावती, यवतमाळला रेड अलर्ट


अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. या दोन्ही जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मुसळधार पावसामुळे नदी-नाल्यांच्या पाणीपातळीत वाढ होण्यासोबतच सखल भागात पाणी साचण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यवतमाळ जिल्ह्यात रात्री उशिरा किंवा ३१ जुलैच्या सकाळच्या सुमारास पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. अमरावतीमध्येही काही भागांत अल्प कालावधीत मोठ्या प्रमाणात पाऊस पडू शकतो.

### महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाचा इशारा

विदर्भाबरोबरच महाराष्ट्रातील इतर भागांमध्येही पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे. पालघर आणि रायगड जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तर मुंबई, ठाणे, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर,



धाराशिव, लातूर, भंडारा, गडचिरोली, गोंदिया, हिंगोली, परभणी, नांदेड आणि बुलढाणा यासह अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज आहे. पावसामुळे काही भागांत रस्त्यांवर पाणी साचणे, वाहतूक विस्कळीत होणे तसेच नदी-नाल्यांना पूर येण्याची शक्यता आहे. डोंगराळ भागात दरडी कोसळण्याचा धोका असलेल्या ठिकाणीही प्रशासनाकडून विशेष लक्ष ठेवले जात आहे.



### देशातील २२ राज्यांनाही इशारा

महाराष्ट्राबरोबरच देशातील तब्बल २२ राज्यांमध्ये पावसाचा इशारा देण्यात आला आहे. दिल्ली, उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, मध्य प्रदेश, आसाम, गुजरात, ओडिशा, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, पंजाब, हरियाणा आणि तामिळनाडूसह विविध राज्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. उत्तर भारतातील काही भागांमध्येही जोरदार पावसामुळे पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता असून, प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत आहे.

# निष्क्रिय लेखापरीक्षकाला हटवून नवीन नियुक्ती

## उपनिबंधक निलम पिंगळे यांची कठोर कारवाई; १३ गृहरचना संस्थांच्या लेखापरीक्षणाला गती

**महाईन्यूज । पुणे**

**सहकारी गृहरचना संस्थांमधील प्रलंबित लेखापरीक्षणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (३) कार्यालयाने कठोर भूमिका घेतली आहे. नियुक्ती होऊनही लेखापरीक्षणाचे काम सुरू न करणाऱ्या लेखापरीक्षकाला पदावरून हटवत त्यांच्या जागी नवीन लेखापरीक्षकाची नियुक्ती करण्यात आली आहे. उपनिबंधक श्रीमती निलम पिंगळे यांनी हा महत्त्वपूर्ण आदेश जारी केला असून, त्यामुळे पुणे शहर परिसरातील १३ सहकारी गृहरचना संस्थांच्या रखडलेल्या लेखापरीक्षणाला अखेर गती मिळणार आहे.**




महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ८१ (१)(अ) आणि कलम ७५ (२अ) नुसार प्रत्येक सहकारी संस्थेने वार्षिक सर्वसाधारण सभेत लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे आणि त्या नियुक्तीची माहिती ३० दिवसांच्या आत निबंधक कार्यालयाला सादर करणे बंधनकारक आहे. मात्र, संबंधित संस्थांनी वार्षिक सभा पार पडून जवळपास पाच महिने उलटल्यानंतरही ही प्रक्रिया पूर्ण केली नसल्याचे उपनिबंधक कार्यालयाच्या निदर्शनास आले. त्यामुळे संस्थांकडून नियमांचे पालन होत नसल्याची गंभीर बाब लक्षात घेऊन कार्यालयाने स्वतःहून हस्तक्षेप करत लेखापरीक्षकाची नियुक्ती केली होती. यानुसार, ३० मार्च २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या आदेशाद्वारे लेखापरीक्षक नामतालिकेतील श्री. सोमनाथ हरिबा शेंद्रा यांची संबंधित संस्थांसाठी नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, नियुक्तीनंतरही त्यांनी कोणत्याही संस्थेकडे जाऊन प्रत्यक्ष लेखापरीक्षणाचे काम सुरू केले नसल्याचे स्पष्ट झाले. यामुळे लेखापरीक्षणाची प्रक्रिया आणखी विलंबित झाली. या निष्क्रियतेची गंभीर दखल घेत उपनिबंधक निलम पिंगळे यांनी तातडीने नवीन आदेश जारी करून श्री. शेंद्रा यांना हटवण्याचा निर्णय घेतला.

त्यांच्या जागी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ८१ (१)(अ) अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून श्रीमती रिमा राजेंद्र सोनटक्के (लेखापरीक्षक नामतालिका क्र. १३३४२, वर्ग-ब) यांची नवीन लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नवीन नियुक्तीनंतर संबंधित सर्व संस्थांचे प्रलंबित लेखापरीक्षण नियोजित वेळेत पूर्ण होईल, अशी अपेक्षा सहकार विभागाने व्यक्त केली आहे.

या निर्णयाचा लाभ चिंचवड, वाकड, पिंपरी आणि पुनावळे परिसरातील एकूण १३ सहकारी गृहरचना संस्थांना होणार आहे. यामध्ये शांतीबन, व्ही.जी. इस्टेट, मनोहर, दर्शनगरी, सागर, श्रद्धा गार्डन, चिरंतन, स्मृती, ज्योतिलिंग, मकरंद, शिवसदा, प्रेमसदा आणि डीएसके कुंजबन या सहकारी गृहरचना संस्थांचा समावेश आहे. या सर्व संस्थांचे लेखापरीक्षण दीर्घकाळ प्रलंबित असल्याने आर्थिक व्यवहारांची पडताळणी आणि नियमांचे पालन याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते.

> "सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण हे केवळ कायदेशीर औपचारिकता नसून संस्थेतील आर्थिक पारदर्शकता आणि सभासदांच्या हितसंरक्षणाचे महत्त्वाचे माध्यम आहे. विहित मुदतीत लेखापरीक्षण पूर्ण होणे ही प्रत्येक संस्थेची जबाबदारी आहे. नियुक्तीनंतरही लेखापरीक्षणाचे काम प्रलंबित राहिल्यास त्याची गांभीर्याने दखल घेतली जाईल. सहकार क्षेत्रात पारदर्शकता, शिस्त आणि उत्तरदायित्व कायम राहावे, यासाठी नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारची दिरंगाई अथवा अनियमितता खपवून घेतली जाणार नाही."
>
> **- श्रीमती निलम पिंगळे, उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (३), पुणे.**

# तपासाच्या नावाखाली पोलिसांचा सातारा पर्यटनाचा प्रकार उघड

**महाईन्यूज । पुणे**

**तपासाच्या नावाखाली विश्रामबाग पोलिस स्टेशनच्या पोलिसांच्या सातारा पर्यटनाचा प्रकार समोर आला आहे. दरम्यान, या प्रकरणाची गंभीर दखल घेत अपर पोलिस आयुक्त राजेश बनसोडे यांनी एका महिला पोलिस अधिकाऱ्यासह तिघांना दोन वर्षे वेतनवाढ रोखण्याची शिक्षा दिली आहे.**



महिला पोलिस उपनिरीक्षक स्वरुपा नाईकवाडे, पोलिस हवालदार श्रीहरी पाटील, महिला पोलिस कर्मचारी कोमल कांबळे अशी तिघा पोलिसांची नावे आहेत. तक्रारदार महिला आपल्या घरी आजारी व्यक्ती असून, मला लवकर घरी जायचे आहे असे वारंवार सांगत असताना देखील तिच्याकडे दुर्लक्ष करत या तिघा पोलिसांनी पर्टनाचा आनंद घेत शेवटी तिला मध्यरात्री १ वाजता घरी न सोडता नारायण पेठ पोलिस चौकी येथे सोडून दिले. हा प्रकार घडल्यानंतर तक्रारदार महिलेने याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली असता, चौकशीत हा प्रकार पुढे आला आहे.

विश्रामबाग पोलिस ठाण्यात कौटुंबिक हिंसाचाराचा गुन्हा दाखल आहे. त्या गुन्ह्याचा तपास नाईकवाडे यांच्याकडे होता. घटनास्थळाचा पंचनामा करण्यासाठी ४ एप्रिल रोजी हे तिघे जण सातारा येथे तक्रारदार महिलेसह गेले होते. तिथे पोहोचल्यानंतर नाईकवाडे यांनी स्थानिक पोलिस ठाण्यास कळवून त्यांची मदत घेऊन तपास करणे आवश्यक होते. मात्र, त्यांनी तसे न करता तेथील एका प्रसिद्ध ढाब्यावर हजेरी लावली. त्यानंतर सव्वातीन वाजता ते शाहूपुरी पोलिस ठाण्यात गेले. पंचनामा करण्यासाठी गेले असता आजूबाजूचे रहिवासी किंवा घटनास्थळावरील व्यक्तींकडे कोणताही तपास केला नाही. खरे तर गुन्हाचा तपास पूर्ण केल्यानंतर स्थानिक पोलिस ठाण्यात नोंद करून पुण्यात परत येणे अपेक्षित होते. मात्र, त्यांनी तसे न करता साताऱ्याजवळील कासपठार व इतर प्रेक्षणीय स्थळांचा आनंद लुटला.

### काय म्हटले आदेशात..?

महिला पोलिस उपनिरीक्षकांसह तिघांनी सातारा येथे जाऊन केवळ मोघम स्वरूपाचा तपास करून तेथील पर्यटनस्थळे पाहण्यात दंग होते. तुम्ही सर्वांनी तक्रारदार यांना तपासासाठी घेऊन जाऊन त्यांच्या गुन्ह्याचा तपास न करता केवळ मैजमजा केली आहे. तुम्ही तुमच्या कर्तव्यात अत्यंत बेजबाबदार, बेशिस्त, निष्काळजीपणाचे वर्तन करून पोलिस दलाची प्रतिमा जनमानसात मलिन होईल असे कृत्य, वर्तन केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. तक्रारदार महिलेची आई आजारी असून, त्या एकट्याच घरी आहेत.

# शहर अभियंता पदोन्नतीवरून भाजपमध्ये विसंवाद?

## महापौर आणि सत्तारुढ पक्षनेत्यांच्या परस्परविरोधी भूमिकांमुळे चर्चेला उधाण

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड महापालिकेतील (PCMC) 'शहर अभियंता' पदोन्नतीचा विषय आता केवळ एका अधिकाऱ्याच्या पदोन्नतीपुरता मर्यादित राहिलेला नाही. हा विषय सत्ताधारी भारतीय जनता पक्षातील अंतर्गत समन्वय, निर्णय प्रक्रिया आणि प्रशासनातील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरत आहे. सर्वसाधारण सभेत मांडण्यात आलेली उपसूचना, त्यामध्ये करण्यात आलेला बदल आणि त्यानंतर महापौर व सत्तारुढ पक्षनेत्यांनी घेतलेल्या परस्परविरोधी भूमिकांमुळे सत्ताधाऱ्यांमध्ये नेमके चालले आहे काय? असा सवाल आता उपस्थित होत आहे.**




महापौर रवी लांडगे यांनी, "उपसूचना मंजूर झालेली नाही. या विषयाचा सखोल अभ्यास करून निर्णय घेतला जाईल," अशी भूमिका घेतली आहे. दुसरीकडे, सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी विधी समितीच्या शिफारशीनुसार उपसूचनेत आवश्यक बदल करण्यात आल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे एकाच विषयावर दोन वेगवेगळ्या भूमिका समोर आल्याने सत्ताधाऱ्यांतील समन्वयाचा अभाव स्पष्टपणे दिसून येत आहे.

### तीन शहर अभियंते; नेमके प्रकरण काय?

मुळात, महापालिकेतील मुख्य अभियंत्यांची दोन पदे रद्द करून त्याऐवजी तीन शहर अभियंत्यांची पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात आला होता. हा प्रस्ताव मंजूर झाल्यास एकाच महापालिकेत तीन शहर अभियंते कार्यरत असतील. मात्र, या प्रस्तावामुळे अनेक कायदेशीर, प्रशासकीय आणि सेवा नियमांशी संबंधित प्रश्न निर्माण झाले आहेत.

### एकाच महापालिकेत तीन शहर अभियंते असू शकतात का?

कायदेशीरदृष्ट्या एकाच महापालिकेत तीन शहर अभियंते असणे अशक्य आहे, असे म्हणता येणार नाही. मात्र, त्यासाठी राज्य शासनाची पूर्वमान्यता, मंजूर आकृतिबंधातील (STAFF PATTERN) आवश्यक बदल, सेवानियमांची पूर्तता तसेच पदोन्नतीचे सर्व निकष पूर्ण करणे बंधनकारक असते. केवळ सर्वसाधारण सभेतील ठरावाच्या आधारे अशी पदनिर्मिती आपोआप कायदेशीर ठरत नाही. जर राज्य शासनाने मंजूर केलेल्या आकृतिबंधात एकच शहर अभियंता पद अस्तित्वात असेल आणि महापालिकेने स्वतःच्या ठरावाद्वारे तीन पदे निर्माण केली, तर शासनाच्या मंजुरीशिवाय त्याला कायदेशीर वैधता प्राप्त होणार नाही. त्यामुळे हा विषय भविष्यात न्यायालयीन वादात अडकण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### भाजपच्या पक्षश्रेष्ठींनीही लक्ष घालण्याची गरज

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील सत्ताधारी भाजपच्या सभागृहातील कारभाराबाबत आता स्थानिक नेतृत्वासह राज्यातील पक्षश्रेष्ठींनीही गांभीर्याने लक्ष घालण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. सर्वसाधारण सभेतील महत्त्वाच्या विषयांवर महापौर, सत्तारुढ पक्षनेते आणि अन्य पदाधिकाऱ्यांच्या परस्परविरोधी भूमिका समोर येत असतील, तर त्याचा परिणाम केवळ प्रशासनावरच नव्हे, तर पक्षाच्या प्रतिमेवरही होत असतो. एकीकडे राज्यातील भाजप नेतृत्व 'सुशासन' आणि 'पारदर्शक कारभार' यावर भर देत असताना, स्थानिक पातळीवर समन्वयाचा अभाव दिसून येणे ही चिंतेची बाब मानली जात आहे. महापालिकेतील निर्णय प्रक्रियेत एकवाक्यता, प्रभावी समन्वय आणि जबाबदाऱ्यांचे स्पष्ट विभाजन यासाठी पक्षश्रेष्ठींनी वेळीच हस्तक्षेप करणे आवश्यक बनले आहे.

### To The Point

'शहर अभियंता' पदोन्नतीचा विषय हा केवळ एका अधिकाऱ्याच्या पदोन्नतीचा वा नवीन पदनिर्मितीचा विषय राहिलेला नाही. तो सत्ताधाऱ्यांच्या निर्णयक्षमतेचा, अंतर्गत समन्वयाचा आणि प्रशासनातील पारदर्शकतेची परीक्षा घेणारा विषय ठरत आहे. 'एक निर्णय आणि दोन भूमिका' असे चित्र नागरिकांसमोर जाणे हे कोणत्याही सत्ताधारी पक्षासाठी हितावह नाही. त्यातच एकाच महापालिकेत तीन शहर अभियंत्यांची पदे निर्माण करण्याच्या प्रस्तावामुळे अनेक कायदेशीर आणि प्रशासकीय प्रश्न निर्माण झाले आहेत. निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता, कायदेशीरता आणि एकमत हीच सत्ताधाऱ्यांसाठी खरी कसोटी ठरणार आहे. त्यामुळे भाजपच्या स्थानिक आणि राज्यातील पक्षश्रेष्ठींनी आता महापालिका सभागृहातील कारभार सुरळीत करण्यासाठी पुढाकार घेण्याची वेळ आली आहे. अन्यथा, हा विषय केवळ राजकीय वादापुरता मर्यादित न राहता न्यायालयीन संघर्षाचे कारणही ठरू शकतो.

# ताथवडेतील अल्पवयीन मुलींवरील अत्याचार प्रकरणी सर्वधर्मीय निषेध रॅली!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**ताथवडे परिसरातील दोन अल्पवयीन मुलींवरील लैंगिक अत्याचार प्रकरणाच्या निषेधार्थ आणि पीडितांना न्याय मिळावा, या मागणीसाठी बुधवारी (ता. २९) सायंकाळी शांततापूर्ण निषेध रॅली काढण्यात आली. या रॅलीत विविध सामाजिक संघटना सर्वपक्षीय व सर्वधर्मीय नागरिकांसह महिलांचा सहभाग लक्षनीय होता. ताथवडे गावठाणातून सुरू झालेल्या या मोर्चाची डांगे चौकातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोर सांगता झाली.**




या प्रकरणात आरोपीवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवून पीडितांना लवकर न्याय मिळावा अशी मागणी करत या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. ताथवडे येथील नृसिंह चौकातून रॅलीला सुरूवात झाली. हातात विविध आशयचे फलक घेतलेल्या मोर्चेकऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. डांगे चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ रॅली येताच अनेकांनी भाषणातून या घटनेचा तीव्र संताप व्यक्त करत निषेध केला. त्यानंतर पोलीस उपायुक्त प्रदीप जाधव यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

यावेळी आमदार शंकर जगताप, स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे, नगरसेवक राहुल कलाटे, कुणाल वाव्हळकर, नगरसेविका रेश्मा भुजबळ, श्रुती वाकडकर, स्नेहा कलाटे, राम वाकडकर, चेतन भुजबळ, सुप्रिया पवार, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे शहराध्यक्ष श्रीकांत नवले, अजित पवार, साकी गायकवाड, रवि भिलारे, सिद्धेश सोनकवडे, विकास जाधव, योगेश पवार, रितू कांबळे यांच्यासह विविध सामाजिक, धार्मिक आणि राजकीय संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसह मोठ्या संख्येने नागरिक या रॅलीत सहभागी झाले होते. सकल हिंदू समाजाच्या वतीने या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

### ताथवडे नाराज मोर्चेकरांचा मोर्चा पोलिस ठाण्याकडे...!

शिवाजी महाराज पुतळ्यासमोर काही नेते मंडळी व कार्यकर्त्यांनी भाषणे करून या घटनेचा निषेध व्यक्त केला. त्यानंतर पोलीस अधिकाऱ्यांना निवेदन देऊन मोर्चाची सांगता झाली. मात्र आम्हाला भाषण करण्याची संधी दिलीच नाही असा आरोप करत शेकडो महिला व पुरुष कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली, घोषणाबाजी करत वाकड पोलिस ठाण्याकडे मोर्चा वळवीला. तिथे अतिरिक्त पोलीस आयुक्त डॉ. बसवराज तेली यांच्याकडे यातील महिलांच्या शिष्टमंडळाने चर्चा करत आरोपीला कठोर शिक्षा होण्यासाठी योग्य कार्यवाही करण्याची मागणी केली.



## भूमिका

**देशातील अब्जाधीशांची संख्या अवघ्या चार-पाच वर्षांत १४२ वरून ५७६ वर पोहोचल्याची माहिती केंद्र सरकारने संसदेत दिली. वरवर पाहता ही आर्थिक प्रगतीची खूण वाटत असली, तरी तिच्या दुसऱ्या बाजूला वाढती आर्थिक विषमता, बेरोजगारी आणि सामान्य नागरिकांचे खालावत चाललेले जीवनमान हे वास्तवही तितकेच गंभीर आहे.**

# अब्जाधीशांची वाढ आणि वाढती आर्थिक विषमता



एका बाजूला सरकारला ८२ कोटी नागरिकांना मोफत धान्य पुरवावे लागत आहे, तर दुसऱ्या बाजूला शेकडो जण शेकडो कोटींची संपत्ती कमावत आहेत.

ही दोन परस्परविरोधी चित्रे भारतीय अर्थव्यवस्थेतील असमतोल अधोरेखित करतात. देशाची अर्थव्यवस्था वाढत असली तरी त्या वाढीचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत समान प्रमाणात पोहोचत नसल्याचे स्पष्ट होते.

'वर्ल्ड इनइक्वॅलिटी रिपोर्ट'नुसार भारतातील वरच्या १० टक्के लोकांकडे राष्ट्रीय उत्पन्नाच्या जवळपास ५८ टक्के संपत्ती आहे, तर उर्वरित ९० टक्के लोकांना फक्त ४२ टक्के उत्पन्नावर समाधान मानावे लागते.

त्यातही सर्वाधिक श्रीमंत असलेल्या एक टक्का लोकांकडे संपत्तीचा मोठा हिस्सा केंद्रित झाला आहे. त्यामुळे श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत, तर सामान्य नागरिकांचे आर्थिक प्रश्न अधिकच गंभीर होत आहेत.अर्थव्यवस्थेतील या असमतोलामागे अनेक कारणे आहेत. नोटाबंदी, जीएसटीच्या अंमलबजावणीतील त्रुटी, सूक्ष्म व लघुउद्योगांवरील ताण, घटती गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीचा मंदावलेला वेग यामुळे मोठा वर्ग आर्थिक संकटात सापडला.

त्यानंतर कोरोनाचे संकट आणि जागतिक अस्थिरतेने परिस्थिती अधिक बिकट केली. परिणामी लाखो लहान उद्योजक आणि व्यापाऱ्यांना मोठे नुकसान सहन करावे लागले. परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांनी अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणावर भारतीय बाजारातून गुंतवणूक काढून घेतल्यानेही अर्थव्यवस्थेवरील दबाव वाढल्याचे दिसते.

अशा परिस्थितीत केवळ अब्जाधीशांची वाढ ही आर्थिक यशाची कसोटी ठरू शकत नाही. खरी प्रगती तीच, जी सर्व समाजघटकांपर्यंत पोहोचते आणि रोजगार, उत्पन्न व जीवनमानात समान सुधारणा घडवून आणते. भारतीय अर्थव्यवस्थेचे यश मोजताना अब्जाधीशांची संख्या नव्हे, तर सामान्य नागरिकांचे जीवनमान, रोजगाराच्या संधी, उद्योगांची प्रगती आणि उत्पन्नातील समता यांना अधिक महत्त्व द्यावे लागेल.

अन्यथा आर्थिक वाढीचे लाभ मोजक्या हातात केंद्रित राहतील आणि सामाजिक विषमता आणखी वाढत जाईल. समावेशक विकास, प्रभावी धोरणे आणि सर्वसमावेशक आर्थिक संधी निर्माण करणे हीच आजची खरी गरज आहे.

## प्रासंगिक »

### गर्विष्ठ मेणबत्ती

**एका गृहस्थाने आपल्या मित्रांना मेजवानीसाठी घरी बोलावले होते. रात्री सर्वजण एका मोठ्या मेणबत्तीच्या प्रकाशात जेवत होते.**

स्वतःच्या प्रकाशामुळे सर्वांना मदत होत असल्याचे पाहून मेणबत्तीला गर्व झाला. ती म्हणाली, "ज्या ठिकाणी सूर्य आणि चंद्राचा प्रकाश पोहोचत नाही, तेथे माझा प्रकाश पोहोचतो. त्यामुळे मी त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ आहे."

तिचे गर्वाचे बोलणे ऐकून उपस्थित मंडळी हसू लागली. त्यांपैकी एका गृहस्थाने खिडकी उघडली. बाहेरून आलेल्या हलक्याशा वाऱ्याच्या झुळुकीने मेणबत्ती लगेच विझली. नंतर त्याने पुन्हा खिडकी बंद करून मेणबत्ती पेटवली आणि म्हणाला, "एवढ्याशा झुळुकीने विझणारी तू स्वतःला सूर्य-चंद्रापेक्षा मोठी समजतेस? ते कधी अशा वाऱ्याने विझत नाहीत. खरे मोठेपण गर्वात नसते, तर आपल्या सामर्थ्याची जाणीव ठेवून कर्तव्य पार पाडण्यात असते."

**- तात्पर्य : आपल्यावर सोपवलेली जबाबदारी प्रामाणिकपणे आणि नम्रतेने पार पाडण्यातच खरे मोठेपण आहे; गर्वाचा शेवट नेहमी अपमानातच होतो.**

जागतिक आर्थिक अनिश्चितता, पश्चिम आशियातील संघर्ष, कच्च्या तेलाच्या अस्थिर किमती आणि रुपयावरील वाढता दबाव या पार्श्वभूमीवर भारतीय रिझर्व्ह बँकेने परकीय चलनसाठा बळकट करण्यासाठी विशेष उपाययोजना सुरू केल्या आहेत.

# चलनसाठ्यापलीकडील आर्थिक आव्हाने



स्वॅप योजना, एफसीएनआर (बी) ठेवी आणि बाह्य व्यावसायिक कर्जांद्वारे डॉलरची उपलब्धता वाढविण्याचा प्रयत्न होत आहे. अल्पकालीन आर्थिक स्थैर्यासाठी ही रणनीती निश्चितच आवश्यक आहे.परकीय चलनसाठा मजबूत असेल, तर विनिमय बाजारातील चढ-उतार नियंत्रित ठेवणे, रुपयावरील दबाव कमी करणे आणि गुंतवणूकदारांचा विश्वास कायम राखणे रिझर्व्ह बँकेस शक्य होते.

त्यामुळे आयातीसाठी आवश्यक विदेशी चलन उपलब्ध राहते आणि जागतिक संकटांचा परिणाम काही प्रमाणात कमी करता येतो. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत रिझर्व्ह बँकेची भूमिका दूरदर्शी म्हणावी लागेल. मात्र, परकीय चलनसाठ्यातील वाढ म्हणजे अर्थव्यवस्थेची दीर्घकालीन ताकद असे मानणे योग्य ठरणार नाही. स्वॅप योजना किंवा बाह्य कर्जांमधून मिळणारे डॉलर हे निश्चित मुदतीचे भांडवल असते. त्याची भविष्यात परतफेड करावी लागते.

त्यामुळे उत्पादनक्षमता, उद्योगांची स्पर्धात्मकता किंवा रोजगारनिर्मिती यांत आपोआप वाढ होत नाही. यासाठी दीर्घकालीन थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) अधिक महत्त्वाची ठरते. एफडीआयमुळे आधुनिक तंत्रज्ञान, उद्योग, व्यवस्थापन कौशल्य, रोजगार आणि निर्यातक्षम उत्पादनाला चालना मिळते. स्थानिक उद्योगांना जागतिक पुरवठा साखळीत स्थान मिळते आणि अर्थव्यवस्थेचा पाया अधिक मजबूत होतो. त्यामुळे केवळ डॉलरची आवक नव्हे, तर गुणवत्तापूर्ण गुंतवणूक आकर्षित करणे आवश्यक आहे. गेल्या काही वर्षांत भारतात सकल एफडीआयचा ओघ सुरू असला, तरी निव्वळ परकीय गुंतवणुकीत घट झाल्याची बाब चिंताजनक आहे. याशिवाय जागतिक व्याजदरातील बदल, भूराजकीय तणाव किंवा डॉलरची वाढती ताकद यामुळे अल्पकालीन भांडवल वेगाने बाहेर पडू शकते. २०१३ मधील 'टेपर टँट्रम'चा अनुभव याचीच आठवण करून देतो.

भारताने दीर्घकालीन आर्थिक स्थैर्यासाठी उद्योगस्नेही वातावरण, पारदर्शक धोरणे, जलद मंजुरी प्रक्रिया, सक्षम पायाभूत सुविधा आणि करव्यवस्थेतील सातत्य यावर भर देणे आवश्यक आहे. मजबूत निर्यात, उच्च मूल्यवर्धित उत्पादन, वित्तीय शिस्त आणि सातत्यपूर्ण परकीय गुंतवणूक यांची सांगड घातल्याशिवाय अर्थव्यवस्थेची खरी ताकद निर्माण होणार नाही. रिझर्व्ह बँकेचा परकीय चलनसाठा वाढविण्याचा निर्णय योग्य असला, तरी भारताच्या आर्थिक भविष्याचा पाया केवळ चलनसाठ्यावर नव्हे, तर उत्पादनक्षमता, स्पर्धात्मक उद्योग आणि शाश्वत विकासावरच उभा राहणार आहे.

## ।। अभंगवाणी ।।



हिरा ठेवितां ऐरणीं ।
वांचे मारितां जो घणीं ॥१॥

तोचि मोल पावे खरा ।
करणीचा होय चुरा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# एक नेता म्हणजे संपूर्ण पक्ष नव्हे

## कपिल सिब्बल यांचा युक्तिवाद, आता शिवसेना पक्ष, चिन्हावरील पुढील सुनावणी ४ ऑगस्टला

**महाईन्यूज । मुंबई**

**शिवसेना हा मूळ पक्ष कुणाचा आणि धनुष्यबाण हे चिन्ह कुणाचं याबाबत आज सर्वोच्च न्यायालयात महत्त्वपूर्ण सुनावणी झाली. यावेळी उद्धवसेनेचेच्यावतीने ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी जोरदार युक्तिवाद केला. तसेच या खटल्यासंदर्भात महत्त्वपूर्ण तर्क सर्वोच्च न्यायालयासमोर मांडले. कपिल सिब्बल यांनी सर्वोच्च न्यायालयात सांगितले की, २०१९ साली एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखाली शिवसेनेकडून निवडणूक लढवली होती.**




तसेच त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये शिंदे हे मंत्री बनले होते. नेता एका पक्षाकडून निवडणूक लढवतो आणि नंतर दुसऱ्या गटाचा किंवा पक्षाचा सदस्य असल्याचा दावा करतो, असा पायंडा हल्ली पडत चालला आहे. याचे संसदीय लोकशाहीवर गंभीर दुष्परिणाम होतात. जर या याचिकेवर वेळीच सुनावणी झाली असती, तर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारची स्थापनाही होऊ शकली नसती, अशी खंतही कपिल सिब्बल यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीत क्रॉस व्होटिंग झाल्यानंतर एकनाथ शिंदे यांच्यासह ३१ आमदार अचानक गुवाहाटीला गेले. तिथे या आमदारांनी परस्पर ठराव मंजूर करून सुनील प्रभू यांच्याऐवजी भरत गोगावले यांची व्हिप म्हणून नियुक्ती केली. हा प्रस्ताव केवळ ३१ आमदारांनी पारित केला होता. मात्र ३१ आमदारांचा एक गट म्हणजे संपूर्ण राजकीय पक्ष असू शकत नाही, असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला.

सिब्बल यांनी पुढे सांगितले की, हे पत्र त्यांनी विधानसभा अध्यक्षांना पाठवले. विधानसभा अध्यक्षांनी हे पत्र राज्यपालांना पाठवले. त्यानंतर राज्यपालांनी फ्लोअर टेस्ट करण्याचे आदेश दिले. त्यावेळी उद्दव ठाकरे हे पक्षप्रमुख होते. त्यामुळे आपणच राजकीय पक्ष आहोत, असा दावा केवळ आमदार करू शकत नाहीत. केवळ विधिमंडळातील आमदार मिळून आपणच पक्ष असल्याचा दावा करू शकतात का? असा सवालही कपिल सिब्बल यांनी उपस्थित केला. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने हा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर या प्रकरणाच्या सुनावणीसाठी ४ ऑगस्ट ही पुढील तारीख दिली आहे.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना कल्याण न्यायालयाने समन्स बजावले आहे. एकाच प्रकरणात हे समन्स बजावण्यात आले असले तरी दोन्ही नेत्यांना वेगवेगळ्या तारखेला सुनावणीसाठी हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले आहे. दिलेल्या वृत्तानुसार, उद्धव ठाकरे यांना येत्या ५ ऑगस्ट रोजी, तर एकनाथ शिंदे यांना ६ ऑगस्टला न्यायालयात सुनावणीसाठी हजर राहावे लागणार आहे.

### न्यायालयाचे म्हणणे काय?

२००९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत कल्याण मतदारसंघात एकसंध राष्ट्रवादीचे उमेदवार वसंत डावखरे विरुद्ध शिवसेनेचे आनंद परांजपे अशी थेट लढत झाली होती. त्यावेळी ठाकरे यांनी घेतलेल्या प्रचारसभेत डावखरे यांचा एक व्हिडिओ दाखवला होता. या प्रकरणी ठाकरे, शिंदे, परांजपे आणि रमाकांत देवळेकर यांच्याविरोधात डावखरे यांनी खटला दाखल केला होता. गेल्या अनेक वर्षांपासून या प्रकरणाची सुनावणी सुरू होती. यादरम्यान ठाकरे आणि शिंदे यांना न्यायालयाने समन्स बजावले असून हजर राहण्याचे निर्देश दिले आहे. त्यामुळे ते नेमकी काय भूमिका मांडणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

# भारताला आतून कमकुवत करण्यासाठी तरुणांना ड्रग्ज पुरवले जातात; मुख्यमंत्री

**महाईन्यूज । मुंबई**

**आज अतिशय महत्त्वाचा दिवस आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नशामुक्त भारताचा संकल्प केला आहे. नशामुक्त भारत करण्यासाठी आपल्याला नशामुक्त मुंबई, महाराष्ट्र करणं गरजेचं आहे. आज आपला देश इतक्या वेगाने विकास करतो आहोत की आपण जगातली सर्वात मोठी चौथी अर्थव्यवस्था झालो आहोत.**




भारत विविध आघाड्यांवर प्रगती करतो आहे. संरक्षण क्षेत्रात भारताने केलेली प्रगती ही जगाला थक्क करते असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

भारताची ताकद जगाला दिसते आहे. भारतासमोर युद्ध पुकारता येत नाही त्यामुळे नवीन पद्धत सुरु झाली ती म्हणजे भारताला आतून पोकळ करायचं. ज्या तरुणाईच्या भरवशावर भारत महाशक्ती म्हणून पुढे येणार आहे. तरुणाईलाच नशेत आणलं गेलं तर उद्याचा भारत कमकुवत होईल असं छुपं युद्ध भारताच्या विरुद्ध सुरु झालं आहे. या छुप्या युद्धाचं सर्वात मोठं शस्त्र ड्रग्ज आहे. हळूहळू युवकांना व्यसनाधीन करत भारताला पोकळ करायचं आणि नेस्तनाबूत करायचं असं षडयंत्र सुरु आहे. त्या षडयंत्रात पैसे कमवण्यासाठी आपल्या देशातील काही शक्ती सामील झाल्या आहेत असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ड्रग्ज फ्री मुंबई या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यवेळी त्यांनी हे वक्तव्य कलं आहे.

एकीकडे ड्रग्जचं वाटप रोखण्यासाठी पोलीस काम करतीलच. पण विद्यार्थ्यांनी, युवकांनी ठरवलं की आम्हाला ड्रग्जच्या आहारी जायचं नाही तर ड्रग्जचं वाटप करण्याची कुणाची हिंमत होणार नाही. पोलीस आपलं काम करत आहेत. तसंच कॉलेज आणि शाळांच्या बाजूला अशी काही विक्री होत नाही ना याकडे लक्ष दिलं जातं आहे. एखाद्या विभागाने काही गोष्टी साध्य होणार नाही. आपल्याला प्रत्येकाला सामूहिक युद्ध पुकारावं लागेल. ज्या युद्धात ड्रग्ज संदर्भातली इको सिस्टिम उधळून टाकावी लागेल.

### मुख्याध्यापकांना मुख्यमंत्र्यांनी केलं महत्त्वाचं आवाहन

आपल्या देशाची युवापिढी ही भारताचं संचलन करणार आहे. तुम्हीच वैज्ञानिक होणार आहात, डॉक्टर होणार आहात, वकील होणार आहात. त्यामुळे तुमचा निग्रह आवश्यक आहे. स्वामी विवेकानंदांनी सांगितलेला युवा, तरुण आपल्याला तयार करायचा आहे. त्यासाठी जाण्याचा मार्ग ड्रग फ्री मुंबई, ड्रग फ्री महाराष्ट्र हा मार्ग आहे. मी स्वतः सगळ्या मुख्याध्यापकांना पत्र लिहितो आहे.

# पाकिस्तानी नाही, फक्त पाकव्याप्त काश्मीर

## ‘त्या’ उल्लेखावरून अमेरिकेतील भारतीय दूतावासाने ‘द न्यूयॉर्क टाईम्स’ला सुनावलं!

महाईन्यूज । नवी दिल्ली

**गेल्या काही दिवसांपासून पाकव्याप्त काश्मीरमध्ये नागरिक महागाईच्या विरोधात आणि विविध मागण्यांसाठी रस्त्यावर उतरलेले आहेत. वाढलेल्या महागाई विरोधात सरकारविरुद्ध तेथील नागरिकांचा मोठा संताप पाहायला मिळत आहे. त्यामुळे नागरिकांकडून आंदोलन करण्यात येत आहेत. मात्र, नागरिकांचं हे आंदोलन मोडीत काढण्यासाठी पाकिस्तान सरकार आणि लष्कराकडून प्रयत्न केले जात आहेत. या आंदोलनात अनेकांचा मृत्यू झाल्याची माहिती देखील सांगितली जाते.**




तसेच पाकिस्तानच्या लष्कराकडून थेट नागरिकांवर गोळीबार करण्यात आल्याचा दावाही केला जात आहे. पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी देखील आंदोलकांवर टीका केली आहे. दरम्यान, पाकव्याप्त काश्मीरमध्ये घडत असलेल्या हिंसाचाराच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर ‘द न्यूयॉर्क टाइम्स’ या अमेरिकी वृत्तपत्राने एक वृत्त प्रसिद्ध केलं होतं. त्या वृत्तात पाकव्याप्त काश्मीरबाबत करण्यात आलेल्या उल्लेखावरून भारताने तीव्र आक्षेप नोंदवला आहे.

‘द न्यूयॉर्क टाइम्स’ने प्रसिद्ध केलेल्या वृत्तात ‘पाकिस्तानव्याप्त काश्मीर’चा उल्लेख ‘पाकिस्तानी काश्मीर’ असा केला आहे. त्यामुळे यावरून अमेरिकेतील भारतीय दूतावासाने ‘द न्यूयॉर्क टाइम्स’ या अमेरिकी वृत्तपत्रावर जोरदार टीका करत सुनावलं आहे. तसेच ‘पाकिस्तानी काश्मीर अशी कोणतीही गोष्ट नसून फक्त पाकिस्तानव्याप्त काश्मीर आहे’, असं म्हणत ‘द न्यूयॉर्क टाइम्स’चं हे वृत्त दिशाभूल करणारं असल्याचं भारताने म्हटलं आहे.

पाकिस्तानच्या बेकायदेशीर ताब्यातील काश्मीरमध्ये (POK) हिंसाचाराचा भडका उडाला आहे. विधानसभा निवडणुकीच्या काळात गेल्या ४८ तासांत किमान ३० जणांचा मृत्यू झाला असून, पाकिस्तानी सैन्यानेच ही हत्या केल्याचा आरोप होत आहे. या घटनेनंतर पाकिस्तानी लष्कराच्या हिंसक कारवाईवर आंतरराष्ट्रीय स्तरावरून कडक शब्दांत ताशेरे ओढले जात आहेत. युनायटेड किंगडममध्ये (UK) राहणाऱ्या काश्मिरी प्रवाशांनी याविरोधात निदर्शने केली आहेत, तर मानवाधिकार संघटना 'ॲम्नेस्टी इंटरनॅशनल'ने या प्रदेशात अधिक स्वायत्ततेची मागणी करणाऱ्या आंदोलकांवर पाकिस्तानी प्रशासनाकडून महिन्यांपासून सुरु असलेल्या दडपशाहीकडे जगाचे लक्ष वेधले आहे. 'जम्मू-काश्मीर संयुक्त अवामी ॲक्शन कमिटी'ने (JAAC) असा गंभीर आरोप केला आहे की, पाकिस्तानी सैन्याने गेल्या दोन दिवसांत ३० हून अधिक नागरिकांची हत्या केली. यामध्ये सोमवारी २५ आणि मंगळवारी ५ जणांचा समावेश आहे.

### भारताने काय म्हटलं?

"‘द न्यूयॉर्क टाइम्स’कडून दिशाभूल करणारे आणि चुकीचे शीर्षक असलेलं एक वृत्त प्रसिद्ध करण्यात आलं आहे. मात्र, ‘पाकिस्तानी काश्मीर’ अशी कोणतीही गोष्ट नाही, तर केवळ पाकिस्तानव्याप्त काश्मीर आहे”, अशा शब्दांत अमेरिकेतील भारतीय दूतावासाने पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधील हिंसाचाराबाबत ‘द न्यूयॉर्क टाइम्स’ या वृत्तपत्राने प्रसिद्ध केलेल्या एका अहवालावरून टीका केली आहे. तसेच या वृत्तपत्राने अहवालात केलेल्या वर्णनावरून भारताने तीव्र आक्षेप नोंदवलत सुनावलं आहे. जोपर्यंत इंटरनेट आणि मोबाईल सेवांवरील बंदी कायम राहील.

# मल्लिकार्जुन खरगेंकडून मनुस्मृतीचा उल्लेख, राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर आरोप

महाईन्यूज । नवी दिल्ली

**काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभा खासदार मल्लिकार्जुन खरगे यांनी मनुस्मृतीचा उल्लेख करत वक्तव्य केल्याने राज्यसभेत चांगलाच गदारोळ झाला. राज्यसभेत मल्लिकार्जुन खरगेंच्या वक्तव्यावर सत्ताधारी पक्षातल्या खासदारांनी आक्षेप घेतला. नेमकं काय घडलं ते आपण जाणून घेऊ. मल्लिकार्जुन खरगे बोलायला उभे राहिले तेव्हा त्यांनी विद्यार्थी आंदोलनाचा उल्लेख केला. तसंच यावेळी त्यांनी पॅलेट गनचा उपयोग करण्याचे आदेश कुणी दिले असा प्रश्न उपस्थित केला.**



तसंच परीक्षा सुरक्षा सुधारणा विधेयकावर जी चर्चा सुरु होती तेव्हा त्यांनी मनुस्मृतीचा उल्लेख केला. ज्यानंतर राज्यसभेत हंगामा पाहण्यास मिळाला.

सरकार आत्तापर्यंत परीक्षा व्यवस्था चांगली करण्यात यशस्वी होऊ शकलेलं नाही. या सरकारकडे व्यवस्था नाही का? यंत्रणा नाही का? तर सगळं आहे, मात्र त्यासाठीचा वेळ नाही. तुमच्या एजन्सी काय करत आहेत? या सरकारकडे उत्तर नाही. २०१५, २०१६, २०२१ आणि २०२६ या वर्षांमध्ये नीटचा पेपर वारंवार फुटला आहे. तसंच त्या त्या वेळी गंभीर आरोपही झाले आहेत. मात्र दरवेळी मोदींची गॅरंटी फेल झाली आहे. मी असं होऊ देणार नाही, पेपर फुटू देणार नाही वगैरे सगळं मोदी सांगतात तरीही पेपरफुटी झाली आहे. तसंच तुम्ही या प्रकरणात शिक्षा कुणाला दिलीत ते सांगा? असा सवालही मल्लिकार्जुन खरगेंनी केला. तसंच तुमचा विकास नेमका कुठे आहे तरी जरा सांगा असा टोलाही लगावला. मागच्या काही वर्षांमध्ये १५२ परीक्षांची पेपरफुटी झाली हा तुमचा विकास आहे का? असं खरगे म्हणाले. यानंतर त्यांनी मनुस्मृतीचा उल्लेख केला.

यानंतर जे. पी. नड्डा उभे राहिले आणि त्यांनी सांगितलं तुम्ही जे सांगत आहात तो उल्लेख मनुस्मृतीमध्ये नाही. त्यानंतर खरगे यांनी बनारस हिंदू विद्यापीठातील पुस्तकाचा दाखला दिला आणि गौतम ऋषींचं नाव घेतलं. या प्रकारानंतर भाजपाचे खासदार आणखी चिडले. सुधांशू त्रिवेदी उभे राहिले आणि म्हणाले की हा चुकीचा उल्लेख आहे तुम्ही सभागृहाच्या कामकाजातून हा उल्लेख काढा. ज्यानंतर सभापती म्हणाले की मी हे रेकॉर्डवर घेणार नाही. यानंतर प्रमोद तिवारी उभे राहून म्हणाले जर यातला उल्लेख चुकीचा आहे तर मग हे पुस्तक तुमच्या शासन काळात कसं विकलं जातं आहे? त्यावर बंदी का नाही? सुधांशू त्रिवेदी पुन्हा उभे राहिले त्यांनी कोलकाता हायकोर्टाचे माजी न्यायाधीश विल्यम जोन्स यांच्यासह बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुस्तकातले उतारे वाचले आणि संदर्भ दिला. तसंच या गदारोळानंतर जे.पी. नड्डा पुन्हा उभे राहिले आणि त्यांनी सांगितलं की हे मनुस्मृतीतलं वाक्य नाही, तुम्ही मूळ वाक्यं काय आहेत ती घेऊन या. यानंतर बराच गदारोळ झाला आणि घोषणाबाजीही झाली.

### मनुस्मृतीचा उल्लेख करत काय म्हणाले खरगे?

शिक्षणाची पद्धत, विषय सगळंच बदलतं आहे. तुम्ही जो अभ्यासक्रम बदलत आहात त्यात क्षुद्रांनी वेद पाठ ऐकला तर त्यांच्या कानात शिसं ओतून कान बंद करा हे सांगितलं जातं आहे. वेद मंत्राचं उच्चार क्षुद्रांनी केला तर जीभ कापली जाते हे शिकवलं जातं आहे. मनुस्मृतीत असलेल्या या तरतुदी हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा अभ्यासक्रम आहे. मी अशा विचारांची निंदा करतो असं मल्लिकार्जुन खरगे म्हणाले. ज्यानंतर राज्यसभेत एकच गदारोळ झाला.

# ‘राम तेरी गंगा मैली’मुळे रातोरात स्टार!



बॉलिवूडमधील ८० च्या दशकातील सर्वाधिक चर्चेत राहिलेल्या अभिनेत्रींपैकी एक असलेल्या मंदाकिनीने आपल्या पहिल्याच सिनेमातून प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. ३० जुलै १९६३ रोजी उत्तर प्रदेशातील मेरठ येथे जन्मलेल्या मंदाकिनीचे मूळ नाव यास्मिन जोसेफ होते. चित्रपटसृष्टीत प्रवेश करताना ‘मंदाकिनी’ हे नाव त्यांना मिळाले. अभिनेत्रीच्या सौंदर्याने अनेकांवर मोहिनी घातली होती. ‘राम तेरी गंगा मैली’ या चित्रपटामुळे मंदाकिनी रातोरात स्टार झाली. मंदाकिनीच्या चित्रपट प्रवासाची सुरुवातही तितकीच रोचक होती. सुरुवातीला ती ‘माधुरी’ या नावाने ओळखली जात होती आणि तिने ‘मजलूम’ हा चित्रपट साइन केला होता. मात्र, चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच तिची भेट दिग्गज दिग्दर्शक राज कपूर यांच्याशी झाली. त्यांनी तिला ‘राम तेरी गंगा मैली’ या चित्रपटासाठी निवडले आणि याच चित्रपटाने तिचे आयुष्य बदलून टाकले. राजीव कपूरसोबतची तिची जोडी प्रेक्षकांना भावली, तर चित्रपटातील काही धाडसी दृश्यांमुळे ती देशभरात चर्चेचा विषय ठरली. ‘राम तेरी गंगा मैली’च्या घवघवीत यशानंतर मंदाकिनीने अनेक चित्रपटांत काम केले. १९८८ मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘जीते हैं शान से’मधील ‘जुली जुली जॉनी का दिल तुमपे आया जुली’ हे गाणे आजही चाहत्यांच्या आठवणीत ताजे आहे. या गाण्यात मिथुन चक्रवर्तीसोबतची तिची केमिस्ट्री विशेष गाजली होती. मात्र, यशाच्या शिखरावर असतानाही तिला चित्रपटसृष्टीतील स्पर्धा आणि आव्हानांचा सामना करावा लागला. राम तेरी गंगा मैली या चित्रपटाएवढी तिच्या दुसऱ्या कोणत्याही चित्रपटाची म्हणावी तशी चर्चा झाली नाही. एका मुलाखतीत तिने कमी मानधन स्वीकारणाऱ्या अभिनेत्रीमुळे एक महत्त्वाचा चित्रपट गमावल्याचा खुलासही केला होता. मंदाकिनीचे नाव एकेकाळी अभिनेता कुमार गौरवसोबत ‘लव्ह स्टोरी’ या चित्रपटाशी जोडले गेले होते. मात्र, या चित्रपटावर प्रत्यक्षात काम झाले नाही. १९९६ मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘झोरदार’नंतर तिने हळूहळू चित्रपटसृष्टीपासून अंतर ठेवण्यास सुरुवात केली. माजी बौद्ध भिक्षू डॉ. काग्युर टी. रिनपोचे ठाकूर यांच्याशी विवाह करून तिने कौटुंबिक आयुष्याला प्राधान्य दिले. चित्रपटसृष्टीपासून दूर राहूनही मंदाकिनीची लोकप्रियता कमी झालेली नाही. ‘राम तेरी गंगा मैली’मधील तिचा अभिनय, तिचे सौंदर्य आणि तिची वेगळी ओळख यामुळे आजही तिचे नाव बॉलिवूडच्या अविस्मरणीय अभिनेत्रींमध्ये घेतले जाते.

# छाया कदम यांचा नवा अंदाज

मराठी चित्रपटसृष्टीतील दमदार अभिनेत्री छाया कदम ( Chhaya Kadam ) या आपल्या नैसर्गिक आणि प्रभावी अभिनयामुळे नेहमीच चर्चेत असतात. मराठीसोबतच हिंदी आणि आंतरराष्ट्रीय चित्रपटांमधील त्यांच्या कामाचेही मोठे कौतुक झाले आहे. अभिनयाइतकीच त्या त्यांच्या साधेपणासाठी आणि वेगळ्या व्यक्तिमत्त्वासाठी ओळखल्या जातात. मात्र यावेळी त्या त्यांच्या अभिनयामुळे नव्हे, तर स्टायलिश आणि हटके लूकमुळे सोशल मीडियावर चर्चेत आल्या आहेत. छाया कदम यांनी नुकतेच त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवर काही नवे फोटो शेअर केले आहेत. या फोटोंमध्ये त्यांचा पूर्णपणे वेगळा आणि मॉडर्न अंदाज पाहायला मिळत आहे. नेहमी साध्या आणि पारंपरिक लूकमध्ये दिसणाऱ्या छाया कदम यांचा हा वेस्टर्न अवतार चाहत्यांना विशेष आवडला आहे. त्यामुळे त्यांच्या या फोटोंवर लाईक्स आणि कमेंट्सचा अक्षरशः पाऊस पडत आहे. या फोटोंमध्ये छाया कदम यांनी निळ्या आणि पांढऱ्या पट्ट्यांचा ओव्हरसाईज्ड शर्ट परिधान केला आहे. हा शर्ट दिसायला साधा असला तरी त्याचा स्टायलिश फिट त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अधिक उठाव देतो. या शर्टसोबत त्यांनी निळ्या रंगाची वाईड-लेग डेनिम जीन्स परिधान केली आहे. या दोन्ही कपड्यांच्या संयोजनामुळे त्यांचा कॅज्युअल आणि ट्रेंडी लूक अधिक आकर्षक दिसत आहे. लूक अधिक खास बनवण्यासाठी त्यांनी काळ्या रंगाचे हिल्स घातले आहेत. त्यासोबत पायात घातलेली सिल्व्हर रंगाची पैंजण सर्वांचे लक्ष वेधून घेते. साधे पण वेगळे ॲक्सेसरीज वापरूनही स्टायलिश लूक कसा तयार करता येतो, याचं उत्तम उदाहरण त्यांनी या फोटोंमधून दाखवून दिलं आहे. छाया कदम यांनी केसांची नीटनेटकी पोनीटेल बांधली असून चेहऱ्यावर अतिशय हलका मेकअप केला आहे. कानात छोटे इअररिंग्स घालून त्यांनी आपला संपूर्ण लूक पूर्ण केला आहे. जास्त मेकअप किंवा दागिन्यांचा वापर न करता त्यांनी साधेपणातही स्टाईल कशी दिसू शकते, हे दाखवून दिलं आहे. या फोटोंसोबत त्यांनी फक्त “Wow” असं छोटंसं कॅप्शन दिलं आहे. कॅप्शन अगदी मोजकं असलं तरी त्याचा प्रभाव चाहत्यांवर स्पष्टपणे दिसून आला. अनेकांनी त्यांच्या आत्मविश्वासाचं, स्टाईलचं आणि वेगळ्या फॅशन सेन्सचं भरभरून कौतुक केलं आहे. सोशल मीडियावर चाहत्यांनी विविध प्रतिक्रिया दिल्या आहेत.



# भालाफेकमध्ये भारताचा डंका!

## नीरज चोप्रासह रोहित यादव आणि यश वीर सिंग अंतिम फेरीत

**महाईन्यूज । ग्लासगो**

**ग्लासगो येथे सुरु असलेल्या कॉमनवेल्थ गेम्स स्पर्धेत भारतीय खेळाडूंचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. स्पर्धेतील आठव्या दिवशी आणखी काही पदकं निश्चित झाली आहे. भारताचा गोल्डन बॉय नीरज चोप्राने भालाफेक क्रीडा प्रकारातील अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. मुख्य बाब म्हणजे नीरज चोप्रासह रोहित यादव आणि यश वीर सिंगने देखील अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. त्यामुळे भालाफेकमध्ये भारताला एकाहून अधिक पदकं मिळण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे.**







नीरज चोप्राने ७९.६१ मीटर लांब थ्रो करुन अंतिम फेरीत आपलं स्थान निश्चित केलं. तर रोहितने ७८.३७ बेस्ट थ्रो करुन फायनलमध्ये प्रवेश केला. तर यशने ७८.३६ मीटर लांब थ्रो करुन अंतिम फेरीत प्रवेश केला. भालाफेक क्रीडा प्रकारात १४ देशातील एकूण १८ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या १८ पैकी १२ खेळाडूंनी अंतिम फेरीत प्रवेश केला असून पदकासाठी झुंज देताना दिसून येणार आहेत.

भारताला यावेळी भालाफेकमध्ये एकाहून अधिक पदक मिळण्याची आशा आहे. पदकासाठीची अंतिम लढत शनिवारी १ ऑगस्टला होणार आहे. भारतीय वेळेनुसार ही लढत दुपारी १२ वाजून १५ मिनिटांनी सुरु होणार आहे. ही लढत तुम्ही सोनी स्पोर्ट्स आणि सोनी लिव्ह ॲपवर लाईव्ह पाहू शकता.

पात्रता फेरीत नीरज चोप्रा ५ व्या स्थानी राहिला. तर श्रीलंकेचा रुमेश पथिराज अव्वल स्थानी राहिला. त्याने ८२.८४ मीटर लांब भाला फेकला. तर ऑलिम्पिक सुवर्णपदकविजेत्या अर्शद नदीमने ७८.६३ मीटर लांब भाला फेकून अंतिम फेरीत स्थान निश्चित केलं. नीरज चोप्राने याआधी २०१८ मध्ये झालेल्या कॉमनवेल्थ गेम्समध्ये सुवर्णपदकाची कमाई केली होती. त्यावेळी त्याने ८६.४७ मीटर लांब थ्रो केला होता. तर २०२२ मध्ये झालेल्या कॉमनवेल्थ गेम्समध्ये तो दुखापतीमुळे सहभागी होऊ शकला नव्हता.

## अजिंक्य रहाणेचा निवृत्तीचा निर्णय; चाहत्यांना अभिवादन करताना झाला भावुक

**महाईन्यूज । मुंबई**

**'मी देशासाठी सर्वतोपरी योगदान दिलं. मी नेहमीच सच्चेपणाने खेळलो. भारतीय क्रिकेटच्या गौरवशाली पर्वाचा मला भाग होता आलं याचा आनंद आणि समाधान आहे. मी खेळणं थांबवत असलो तरी खेळाप्रति योगदान देतच राहीन. मुंबई क्रिकेटने मला घडवलं. माझे आईबाबा, पत्नी आणि मुलं सदैव माझ्या पाठीशी उभे राहिले. मी ही वाटचाल करू शकलो कारण तुमचं प्रेम', हे बोलताना अजिंक्य गहिवरला. 'तुम्ही कधीच परकं मानलं नाहीत, सदैव साथ दिलीत', सांगताना अजिंक्यला अश्रू आवरले नाहीत. भारतीय संघाचा माजी कर्णधार, मधल्या फळीतील शैलीदार फलंदाज अजिंक्यने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला आहे.**





अजिंक्यने ८५ टेस्ट, ९० वनडे आणि २० टी२० सामन्यात भारताचं प्रतिनिधित्व केलं. डोंबिवली ते मुंबई असा लोकल ट्रेनने प्रवास करून क्रिकेटची धुळाक्षरं गिरवणाऱ्या अजिंक्यने डोमेस्टिक क्रिकेटमध्ये मुंबई संघासाठी दमदार कामगिरी करत राष्ट्रीय संघात स्थान पटकावलं. दिग्गजांच्या उपस्थितीमुळे प्रदीर्घ काळ राखीव खेळाडूंमध्ये बसावं लागलेल्या अजिंक्यने संधी मिळाल्यानंतर आपली ताकद दाखवून दिली. भारतीय संघासाठी मधल्या फळीतील भरवशाचा फलंदाज झाला. विराट कोहलीचा विश्वासू साथीदार असलेल्या अजिंक्यच्या नेतृत्वातच भारतीय संघाने ऑस्ट्रेलियात बॉर्डर गावस्कर जेतेपदावर नाव कोरलं. शांत, संयमी आणि शिस्तबद्ध अजिंक्यने नेहमीच संघहिताला प्राधान्य दिलं.

'डोंबिवलीतून मुंबईत लोकलने येत क्रिकेट खेळणाऱ्या त्या मुलाचं देशासाठी खेळायचं स्वप्न पूर्ण झालं. भारतासाठी खेळणं हा माझ्यासाठी अतिशय आनंददायी आणि अभिमानास्पद असे. बीसीसीआय, प्रशिक्षक, सपोर्ट स्टाफ आणि सहकारी खेळाडू यांच्या ठोस पाठिंब्यामुळेच भारतासाठी नियमितपणे खेळू शकलो. प्रत्येक गोष्टीची एक सुरुवात असते आणि शेवटही असतो. माझ्यासाठी हा निर्णय घेणं सोपं नव्हतं पण थांबण्याची हीच योग्य वेळ आहे. बॅटिंग करताना मी टायमिंगला नेहमीच महत्त्व दिलं', असं अजिंक्य म्हणाला.

स्मार्ट PCMC
SMART CITY
# महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। शुक्रवार ।
दि. 31 जुलै 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# तरुणांसाठी “लाईटहाऊस” ठरत आहे आशेचा किरण!

## ६३९ विद्यार्थ्यांना मिळाला रोजगार; कौशल्य विकास उपक्रमाचे केले कौतुक

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**शहरातील वंचित आणि होतकरू तरुण-तरुणींना रोजगारक्षम बनविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या भोसरी लाईटहाऊस कौशल्य विकास केंद्राला भारतीय जनता पार्टीच्या नगरसेविका प्रा. सोनाली गव्हाणे यांनी सदिच्छा भेट देत केंद्रातील उपक्रमांची पाहणी केली. यावेळी त्यांनी अधिकारी, कर्मचारी तसेच प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या अनुभवांची जाणून घेतली. या प्रकल्पामुळे परिसरातील तरुणाईला रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होत असल्याचे सांगत त्यांनी उपक्रमाचे कौतुक केले.**



भोसरी येथील गव्हाणे वस्तीमधील बहुउद्देशीय हॉल येथे फेब्रुवारी २०२४ पासून हा प्रकल्प कार्यरत आहे. लांडेवाडी, चक्रपाणी वसाहत, खंडोबा माळ, धावडे वस्ती, आळंदी रोड, शांतीनगर, दिघी रोड आणि भोसरी गाव परिसरातील १८ ते ३५ वयोगटातील तरुण-तरुणींना या केंद्रामार्फत कौशल्य विकासाचे प्रशिक्षण दिले जात आहे.

प्रा. सोनाली गव्हाणे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना प्रशिक्षणामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात झालेला बदल, आत्मविश्वास वृद्धीसाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम आणि रोजगाराच्या संधींबाबत सविस्तर माहिती जाणून घेतली. तसेच केंद्रातील अधिकाऱ्यांकडून फाउंडेशन कोर्स, स्किलिंग कोर्स आणि प्लेसमेंट प्रक्रियेची माहिती घेत प्रशिक्षणाच्या गुणवत्तेबाबत समाधान व्यक्त केले.

भोसरी लाईटहाऊस केंद्राच्या माध्यमातून आतापर्यंत १,४०० विद्यार्थ्यांनी फाउंडेशन कोर्ससाठी नोंदणी केली असून, त्यापैकी १,१८७ विद्यार्थ्यांनी हा कोर्स यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे. तसेच ४२० विद्यार्थ्यांनी स्किलिंग कोर्ससाठी नोंदणी केली असून, ३१३ विद्यार्थ्यांनी तो पूर्ण केला आहे. विशेष म्हणजे, या प्रशिक्षणाच्या बळावर तब्बल ६३९ विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांत रोजगार मिळविण्यात यश आले आहे. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी आपल्या अनुभवांचे कथन करत, लाईटहाऊस प्रकल्पामुळे आत्मविश्वास वाढल्याबरोबरच करिअरला योग्य दिशा मिळाल्याची भावना व्यक्त केली. अनेक विद्यार्थ्यांसाठी हा प्रकल्प रोजगाराचे दालन खुला करणारा ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रा. सोनाली गव्हाणे यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना, “कौशल्य विकास हा आजच्या काळातील सर्वांत प्रभावी सक्षमीकरणाचा मार्ग आहे. भोसरीतील तरुणांना दर्जेदार प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारा लाईटहाऊस प्रकल्प अत्यंत स्तुत्य असून, अशा उपक्रमांमुळे समाजातील वंचित घटकांतील युवक-युवतींना स्वावलंबी होण्याची संधी मिळत आहे. भविष्यातही या प्रकल्पाला आवश्यक ते सहकार्य करण्यासाठी मी कटिबद्ध आहे,” असे मत व्यक्त केले. या भेटीप्रसंगी केंद्रातील अधिकारी, कर्मचारी आणि प्रशिक्षणार्थी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



“ आजच्या स्पर्धेच्या युगात केवळ पदवी नव्हे, तर कौशल्य हीच तरुणाईची खरी ताकद आहे. भोसरी लाईटहाऊस प्रकल्पाच्या माध्यमातून परिसरातील युवक-युवतींना दर्जेदार कौशल्य प्रशिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. आतापर्यंत शेकडो विद्यार्थ्यांनी या उपक्रमाच्या माध्यमातून स्वतःच्या पायावर उभे राहत रोजगार मिळविला आहे. अशा उपक्रमांमुळे आपल्या तरुणाईला आत्मविश्वास, योग्य दिशा आणि उज्ज्वल भविष्य मिळत असून, भविष्यातही या प्रकल्पाच्या बळकटीकरणासाठी आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यासाठी मी कटिबद्ध आहे.

**- प्रा. सोनाली गव्हाणे, नगरसेविका, भोसरी.**

# प्रभागातील नागरी समस्या तातडीने सोडवा : सभापती अभिषेक बारणे

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या थेरगाव येथील ‘ग’ (पुरंदर) क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग समितीची बैठक स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली आज गुरुवारी (ता. 30) पार पडली. बैठकीत प्रभागातील विविध विकासकामांचा आढावा घेतला. तसेच, नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित विविध नागरी समस्यांवर चर्चा करून त्यावर तातडीने उपाययोजना करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सभापती बारणे यांनी सूचना केल्या.**





प्रभाग समिती अध्यक्षांच्या निवडीनंतर पहिलीच बैठक असल्याने सभापती बारणे यांनी सर्व सदस्यांना सभा कामकाजाची यावेळी माहिती समजवून सांगितली. प्रभागातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, जलनिस्सारण, सार्वजनिक सुविधा तसेच सुरू असलेल्या आणि प्रस्तावित विकासकामांच्या प्रगतीचा आढावा घेतला. नागरिकांना अधिक दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विविध विकासकामे वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्यावर भर देण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

यावेळी सभापती बारणे यांनी प्रभाग समितीच्या नवनियुक्त अध्यक्षा मनिषा पवार यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. त्यांच्या आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा देत प्रभागाच्या विकासासाठी सर्वांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. कोण कुठल्या पक्षाचा यापेक्षा नारिकांचे प्रश्न किती महत्वाचे आहेत, यावर लक्ष केंद्रीत करुन नागरिकांना सुविधा देण्याची ही संधी आहे. त्यामुळे प्रभाग समितीचे कामकाज सकारात्मक चर्चेतून अधिक प्रभावीपणे पार पाडेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

नागरिकांच्या अपेक्षांनुसार विकासकामांना गती देत अधिक सक्षम आणि सुविधायुक्त प्रभाग उभारण्यासाठी महापालिका कटिबद्ध असल्याचे सभापती बारणे यांनी सांगितले. या बैठकीस प्रभागातील नगरसेवक, संबंधित विभागांचे अधिकारी तसेच विविध शाखांचे कर्मचारी उपस्थित होते.

# गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वावर समाजकार्यासाठी “समर्पण”

## भाजपाचे संघटन सरचिटणीस ॲड. मोरेश्वर शेडगे यांची सामाजिक संवेदना

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**गुरुपौर्णिमा म्हणजे गुरुचरणी कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि समाजासाठी समर्पणाची भावना दृढ करण्याचा दिवस. या पावन पर्वाचे औचित्य साधत भारतीय जनता पार्टी, पिंपरी-चिंचवडचे संघटन सरचिटणीस ॲड. मोरेश्वर शेडगे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून क्रांतिवीर चापेकर स्मारक समिती संचालित पुनरुत्थान समरसता गुरुकुलम, क्रांतिवीर चापेकर स्मारक आणि क्रांतिवीर चापेकर विद्यालयाच्या दुरुस्ती व बांधकामासाठी आर्थिक स्वरूपात देणगी अर्पण करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालून दिला.**



नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे पुनरुत्थान समरसता गुरुकुलम संकुलाचे मोठे नुकसान झाले होते. त्यामुळे येथील विद्यार्थी, विद्यालय आणि गोशाळेला नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागला. या पार्श्वभूमीवर ॲड. शेडगे यांनी विद्यार्थी संकुलासाठी ५१ हजार रुपये, विद्यालयासाठी ५१ हजार रुपये अशी एकूण एक लाख रुपयांची आर्थिक मदत सुपूर्द केली. तसेच, गोशाळेसाठी एक टन चाऱ्याचीही मदत उपलब्ध करून देण्यात आली.

चिंचवड येथील पुनरुत्थान समरसता गुरुकुलममध्ये आयोजित गुरुपौर्णिमा उत्सवात ही देणगी पद्मश्री डॉ. गिरीश प्रभुणे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. भारतीय जनता पक्षाचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

यावेळी बोलताना ॲड. मोरेश्वर शेडगे म्हणाले, "गुरुंचे आशीर्वाद आणि समाजसेवेची प्रेरणा हीच खरी संपत्ती आहे. माझ्या वाढदिवसानिमित्त होणारा खर्च समाजोपयोगी कार्यासाठी वापरण्याचा संकल्प केला होता. गुरुपौर्णिमेच्या पवित्र दिवशी गुरुचरणी कृतज्ञतेची ही छोटीशी अर्पणभावना व्यक्त करता आली, याचे मनस्वी समाधान वाटते."

आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षण, संस्कार आणि सर्वांगीण विकासासाठी पुनरुत्थान समरसता गुरुकुलम गेल्या अनेक वर्षांपासून उल्लेखनीय कार्य करीत आहे. या संस्थेच्या माध्यमातून समाजातील वंचित घटकांपर्यंत शिक्षणाचा प्रकाश पोहोचविण्याचे कार्य सुरू असून, या कार्याला हातभार लावण्याचा संकल्प ॲड. मोरेश्वर शेडगे यांनी गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने प्रत्यक्ष कृतीतून साकारला.

दरम्यान, पुनरुत्थान समरसता गुरुकुलम परिवाराच्या वतीने ॲड. मोरेश्वर शेडगे यांचा हृदयस्पर्शी सत्कार करण्यात आला. हा सन्मान स्वीकारताना त्यांनी तो समाजसेवेसाठी कार्यरत असलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याचा असल्याची भावना व्यक्त केली.

या कार्यक्रमास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पिंपरी-चिंचवड कार्यवाह नरेंद्रजी पेंडसे, पद्मश्री डॉ. गिरीश प्रभुणे, भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे पुणे विभाग संघटन मंत्री प्रतीक पावडे, पिंपरी-चिंचवड प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिवराव खाडे, 'ब' प्रभाग समितीचे अध्यक्ष मंदार देशपांडे, सामाजिक समरसता साहित्य परिषदेच्या शोभाताई जोशी, संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याच्या माजी संचालिका चंद्रकलाताई शेडगे, भाजप राज्य परिषदेचे सदस्य पाटीलबुवा चिंचवडे, चिंचवड ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष नंदकुमार मुरडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षकवृंद आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वावर गुरुचरणी कृतज्ञता आणि समाजकार्यासाठी समर्पणाचा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.

> “गुरु हे केवळ ज्ञानाचे दाते नसून, ते समाजसेवा आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा देणारे दीपस्तंभ आहेत. माझ्या वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून समाजोपयोगी कार्यासाठी योगदान देण्याचा संकल्प मी केला होता. गुरुपौर्णिमेच्या पावन दिवशी पुनरुत्थान समरसता गुरुकुलमच्या माध्यमातून आदिवासी बांधवांच्या शिक्षण आणि संस्काराच्या कार्यात खारीचा वाटा उचलता आला, हीच माझ्यासाठी सर्वात मोठी आनंदाची आणि समाधानाची बाब आहे. समाजाने आपल्याला भरभरून दिले आहे, त्याचे ऋण अशा विधायक कार्यातून फेडण्याचा हा एक छोटासा प्रयत्न आहे."
>
> **– ॲड. मोरेश्वर शेडगे, संघटन सरचिटणीस, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**



# LANGUAGE OF LITTLE HEARTS

Every child expresses emotions in a unique way. Some speak openly, some remain silent, some suddenly cry, while others hide their feelings behind a smile. At times they enjoy being with friends, and at other times they choose to be alone. A child's behaviour always has a reason. They may be feeling unwell, missing someone, struggling with a challenge, or simply unable to express what is in their heart. As parents and teachers, it is our responsibility to observe with patience, listen without judgement, and gently understand what they are trying to communicate. Instead of pointing out their mistakes in front of others, let us recognise and appreciate their strengths, talents, and kind qualities. Every child deserves to feel heard, respected, and valued. When we understand their emotions with empathy and care, we help them feel safe, build confidence, and grow into emotionally strong and compassionate individuals. "Children may forget our words, but they will always remember how we made them feel."

**Ms.Archana Bhika,**
**Educator**
**Preschool Section**
**Priyadarshini**
**School, Moshi.**

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE

# व्ही.के. माटे हायस्कूलमध्ये कारगिल विजय दिन संपन्न

## देशभक्तीपर गीत, कविता आणि मानवंदनेतून कारगिल वीरांना सलाम

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**दिनांक 26 जुलै रोजी कारगिल विजयदीन मोठ्या उत्साहात व देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलनाने झाली .कारगिल युद्धात शौर्य गाजवणाऱ्या वीर जवानांना अमर ज्योत प्रज्वलित करून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली .तसेच एमसीएफ च्या विद्यार्थ्यांनी मानवंदना दिली. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, कविता, सादर करून भारतीय सैनिकांच्या शौर्याला सलाम केला.**




कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत मोरया शिक्षण संस्थेच्या कार्यवाह, तहयात विश्वस्त, प्राचार्य इंद्रायणी माटे पिसोळकर यांनी भारतीय सैनिकांचे कारगिल युद्धातील अतुलनीय साहस त्याग याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माजी हवाई दल अधिकारी नंदू सारंग, प्रमुख पाहुणे ब्रिगेडियर प्रताप भोसले यांनी कारगिल युद्धाचा इतिहास, देशप्रेम बलिदान याबद्दल सविस्तर माहिती देऊन युद्धातील प्रसंग सांगितले आणि विद्यार्थ्यांनी सैन्यात भरती होऊन देश सेवा करण्याचे आवाहन केले.

अभ्यासाबरोबरच आपले शारीरिक स्वास्थ्य चांगले ठेवणे कसे आवश्यक आहे हे त्यांच्या अनुभव कथनातून सांगितले. प्रमुख पाहुणे ब्रिगेडियर प्रताप भोसले यांनी युद्धाच्या प्रसंगांचे अनुभव मनोरंजक रित्या सांगून विद्यार्थ्यांची संवाद साधला.

कार्यक्रमाला उपमुख्याध्यापक दिलीप कुमावत, पर्यवेक्षिका मैत्रेयी राजे उपस्थित होते .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता बोरसे यांनी केले आभार प्रदर्शन मनीषा उजंळबकर, तर कार्यक्रमाची सांगता क्रीडाशिक्षक पंकज देव यांनी वंदे मातरम ने केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.



# भीमाशंकर येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचे समाजसेवा शिबिर उत्साहात संपन्न

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**व्ही. के. माटे हायस्कूल श्रीधर नगर, चिंचवड विद्यालयाच्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचे एक दिवसीय समाजसेवा शिबिर नुकतेच भीमाशंकर तालुका खेड, जिल्हा पुणे येथे उत्साहात संपन्न झाले. शिबिरात विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संवर्धन आणि श्रमसंस्कार यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.**



शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांनी परिसर स्वच्छता, वृक्षारोपण, प्लास्टिकमुक्ती अभियान, ग्रामस्वच्छता, श्रमदान, तसेच पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती अशा विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी स्थानिक ग्रामस्थांशी संवाद साधून स्वच्छता, पाणी बचत आणि वनसंवर्धनाचा संदेश दिला.

संध्याकाळी सांस्कृतिक कार्यक्रम, देशभक्तीपर गीत, पथनाट्य आणि प्रेरणादायी व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. भीमाशंकरच्या निसर्गरम्य वातावरणात विद्यार्थ्यांना जैवविविधता, वन्यजीव संरक्षण आणि सह्याद्रीच्या नैसर्गिक संपदेची प्रत्यक्ष माहिती मिळाली केले.

हे समाजसेवा शिबिर विद्यार्थ्यांसाठी सामाजिक जाणीव, नेतृत्वगुण, शिस्त, सहकार्य आणि पर्यावरणप्रेम जोपासणारा अविस्मरणीय अनुभव ठरला.भरपूर पाऊस, भरपूर आनंद विद्यार्थ्यांनी घेतला. समाजसेवा शिबिराचे आयोजन मोरया शिक्षण संस्थेच्या तहयात विश्वस्त, कार्यवाह , प्राचार्या मा. सौ.इंद्रायणी माटे पिसोळकर यांनी केले.समाजसेवा शिबिर यशस्वी करण्यासाठी उप मुख्याध्यापक श्री दिलीप कुमावत, पर्यवेक्षिका सौ मैत्रेयी राजे, सहल विभाग प्रमुख सौ प्रांजली कुलकर्णी, श्री हनुमंत हुचगोळ यांनी मेहनत घेतली.